न्यासा ह्युमन डेव्हलपमेंट अँन्ड रिसर्च सेंटर

प्लॉट नं. 118, शिवगंगा नगर भाग-3, जुळे सोलापूर, सोलापूर - 413004

info@nyasaa.org , http://nysaa.org/ Contact : 9833495659 / 9975116220 / 8329065790

Unique Registration Number : AAFCN7193MF20251 (80G)

न्यासा मानव विकास व संशोधन केंद्र
स्थापना दिनांक : १७ जुलै २०१७
संतोषी माता मंदिराजवळ, जुळे सोलापूर – ४१३ ००८
दूरध्वनी : ८३२९०६५७९०

**न्यासाची ओळख**

न्यासा मानव विकास व संशोधन केंद्राने सांस्कृतिक, शैक्षणिक, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण, साहित्य, आध्यात्मिक उपचारात्मक संगीत व पर्यटन विकास या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. गेल्या १८ वर्षांपासून न्यासा राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर (स्वित्झर्लंडसह) विविध अभिनव कार्यशाळा व कार्यक्रम राबवत आहे.

**न्यासाच्या प्रमुख कार्यांचा संक्षिप्त आढावा :**

१) सोलापूर (दक्षिण) येथील सोरेगाव येथे न्यासा मानव विकास व संशोधन सांस्कृतिक केंद्र व ग्रंथालयाची उभारणी.

२) कर्नाटक सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने वचन संगम, गडीनाड साहित्य-संस्कृती उत्सव व संगीत कार्यक्रमांचे आयोजन.

३) महाराष्ट्र सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने अभंगवाणी संगीत कार्यक्रमांचे आयोजन.

४) न्यासाने जागतिक दर्जाचे ६४ आध्यात्मिक संगीत अल्बम निर्मित केले आहेत.

५) सुमारे एक लाख विद्यार्थी, शिक्षक व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी संगीत ध्यान (म्युझिकल मेडिटेशन) कार्यक्रमांचे आयोजन. तसेच परदेशी भाषा तज्ज्ञ व संसाधन व्यक्तींशी सहकार्य.

६) संस्कृत, मराठी, हिंदी व इतर सर्व भारतीय भाषांच्या संवर्धनासाठी न्यासाचे योगदान.

७) विविध विद्यापीठे, नामांकित संस्था व संघटनांसोबत सामंजस्य करार (MOU).

८) भारतीय पारंपरिक संस्कृतीच्या प्रचारासाठी अनेक महत्वाच्या पुस्तकांचे संपादन.

९) ग्रामीण विकास : महिला बचत गट, शेतकरी यांच्यासाठी कौशल्य विकास व मानवी सक्षमीकरण प्रशिक्षण, तसेच सेंद्रिय शेती कार्यशाळांचे आयोजन.

१०) विशेषतः शासकीय क्षेत्रातील आयएएस अधिकारी, ग्रामसेवक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, पोलीस विभाग, अनाथालये व इतर शासकीय कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी प्रशिक्षण, ताणतणावमुक्ती कार्यक्रम, अंतर्गत संतुलन इत्यादी.

११) सकाळ मॅरेथॉन कार्यक्रम, पर्यावरण जनजागृती व स्पर्धा परीक्षा जनजागृती कार्यक्रमांचे समन्वयक म्हणून आयोजन.

१२) आरोग्य शिबिरे व जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन